प्रकरण चौथे

# पांडुरंग गोविंद पाटील
# (पांडु मास्तर)
# व
# क्रांतीवीर नागनाथ नायकवडी

क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या इतकेच धडाडीचे पांडू मास्तर होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रतिसरकार चळवळींचा सोनेरी  इतिहास चाळताना क्रांतीवीर पांडू मास्तरांनी केलेले अलौकीक कार्य नजरेआड करून चालणार नाही.

क्रांतीवीर पांडूरंग गोविंद पाटील उर्फ पांडू मास्तर यांचा जन्म १५ जूलै, १९०६ ला येडेनिपाणी येथे झाला. वडील गोविंद पाटील वारकरी संप्रदायातील त्यामुळे कुटुंबातील वातावरण धार्मिक होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थीतीत त्यांनी ७ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. प्राथमिक शिक्षकाची नोकरी पत्करली. [१] याच कालावधीत ब्रिटीश विरोधी आंदोलन तीव्र स्वरूपात होते. या आंदोलनाकडे पांडू मास्तरांचे आकर्षण वाढत होते. या विषयी त्यांची सारखी चर्चा चालत होती. डोक्यात एकच विषय स्वातंत्र्य मिळवणे हाच होता.

७-२-१९२७ रोजी महात्मा गांधींची इस्लामपूर येथे  सभा होती. तालुक्यातील, खेडया-पाडयातील माणसं इस्लामपूराकडे निघाली होती. काही बैलगाडयातून, काही सायकलवरून, बरेचजण पायीच लवकर इस्लामपूर गाठण्यासाठी घाई करत होते. चालता-चालता त्यांची चर्चा चालली होती. चर्चेचा विषय एकच होता महात्मा गांधी आणि त्यांची चळवळ. महात्मा गांधीबददल केवळ आदरच नव्हे तर भक्तीची भावना होती. महात्मा गांधी आपल्या भागात येणार त्यांचे शब्द आपल्याला ऐकता येणार या विचाराने लोकांच्या भावना उचंबळून आल्या होत्या.

महात्माजी आल्यानंतर प्रचंड जयघोष उत्स्फुर्त जनसमुदायातून उठला. दोन पुढारी बोलून झाल्यानंतर, महात्माजी बोलायला उभे राहीले. ते सोप्या हिंदीत बोलले. सत्याग्रह, असहकार, खादीची चळवळ यांच स्वरूप समजावून सांगीतल. स्वदेशीय महत्व विशद केल खादी हेच स्वदेशीच खर स्वरूप असल्याच प्रतिपादन केलं. देशसेवा ही कुणाची मक्तेदारी नाही. लहानातला लहान, सामान्यातला सामान्य मनुष्यही देशासाठी काही करू शकतो.

मोह, स्वार्थ यांचा त्याग करून देश कार्यासाठी स्वत:ला वाहून घेतल पाहीजे. असं सांगून महात्माजींनी आपल भाषण संपत्रल.[२]

याचवेळी उभ्या राहीलेल्या गर्दीतून पांडू मास्तर ढकला ढकली करून, पाय तुडवत, शिव्या खात ते व्यासपीठाजवळ पोहचले. तिथल्या कार्यकर्त्यांच्या विरोधाला न जुमानता पांडू मास्तर व्यासपीठ चढून गांधीजींच्या जवळ गेले. त्यांनी वाकून महात्माजींच्या पायांना स्पर्श केला. गांधीजींनी आशिर्वाद देताना देशहिताच काम करण्यास सांगितले.

पांडू मास्तरांच्या जीवनावर महात्मा गांधीचा विलक्षण प्रभाव पडला. येथून त्यांनी पूर्णपणे स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली. शिक्षकीपेशाचा त्याग केला.[३] घरातील लोकांचा नोकरी त्यागासंबधी विरोध होता. परंतु पांडू मास्तरानी कोणाशी चर्चा न करता आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. यामुळे आर्थिक परिस्थिती खुपच खालावली होती. त्यांचे मोठे बंधू गणपतराव हे खुपच नाराज झाले. या सगळया गोष्टीकडे दुर्लक्ष करून पांडू मास्तर स्वातंत्र्य लढ्या विषयी विचार करू लागले.

१९२५ साली सातवी पास झाल्यानंतर पांडूरंग पाटलांनी कासेगावच्या प्राथमिक शाळेत शिक्षकाची नोकरी पत्करली होती. तेव्हापासून ते पांडू मास्तर म्हणून ओळखले जात होते. त्या काळात ग्रामीण जनतेच्या जीवनात शिक्षकाला महत्वाचे स्थान होते. अडाणी गावकऱ्यांना हे शिक्षक हरप्रकारे मदत करीत. पत्रे वाचून दाखवणे, लिहून देणे. सरकारी व खाजगी कागदपत्रांचा अर्थ स्पष्ट करणे. अशी कामे ते करीत. यामुळे पांडू मास्तरांना स्वातंत्र्य चळवळीत काम करत असताना मोठी मदत झाली सुरवातीला गांवामध्ये लोकांना स्वातंत्र्याविषयी महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करीत. आपल्या घरामध्येही हे पटवण्याचा प्रयत्न करीत हळूहळू आसपासच्या गावात जावून पांडू मास्तर बैठका घेऊ लागले. नोकरी सोडल्यावर थोडयाच दिवसात त्यांच्या मोठया भावाचा गणपतरावाचा खून झाला. घराची पूर्ण जबाबदारी त्यांच्यावर येवून पडली अशा अवस्थेत त्यांची थोडीशी व्दिधा अवस्था झाली, परंतू त्यांनी अग्रक्रम देशसेवेसाठी दिला.[४]

पहाटेच्या वेळी पांडूमास्तर, ईश्वरा गुरव व चारपाच तरूण मुलांना बरोबर घेऊन गावातले रस्ते बोळ झाडत होते. प्रत्येकाच्या हातात खराटा असत. दोघांकडे पाटया असत. एकेक रस्ता झाडंत. एकेक गल्ली साफ करीत. हे गांधी लोक पुढे पुढे सरकत असत. पांडू मास्तर स्वतः झाडताना लोक बघू लागली. लोकांना ते घाणीमुळे रोगराई पसरते सांगू लागले. थोडयाच दिवसात येडेनिपाणीतील लोक आपल्या घरासमोरील परिसर स्वच्छ ठेवू लागले. नंतरचा कार्यक्रम प्रभातफेरीचा असे पांडूमास्तर स्वतःच्या गळयात महात्मा गांधीचा फोटो अडकवत व तो छातीवर धरत . हिंदुराव पाटलांच्या हातात तिरंगा झेंडा असत. पांडू मास्तर पुढे असत. तरुण मुले दोन ओळीत उभी असत. प्रथम पांडु मास्तर 'वंदे मातरम् ' म्हणत या घोषणेला जोरदार प्रतिसाद मिळायचा फेरी पुंढ जशी सरकेल तशी काही शाळकरी मुलं फेरीमध्ये सामील होतं. भारतमाता की जय, महात्मा गांधी की जय या सारख्या घोषणा देत गावकरी रस्त्यावर थांबून उत्सुकतेने फेरी बघु लागली. नंतर हळूहळू त्यामध्ये सामील होऊ लागली. फेरीचा समारोप चावडी चौकात होत असे तेथे असणाऱ्या झाडांवर तिरंगा फडकवला जात. राष्ट्रीय गाणी म्हटली जात. लोक जमले तर पांडू मास्तर भाषण करीत.[५]

चैत्र महिन्याच्या अखेरच्या दिवशी येडेनिपाणीत मारुतीची यात्रा असते. देवळापुढे भाविकांची गर्दी जमली होती. पारावर तमाशा उभा होता. तिथे रंगेल रसिकांची तुफान गर्दी जमली होती. गणगवळण सुरु झाली होती याच दरम्यान पांडू मास्तर तिथे आले. त्यांनी तो तमाशा थांबविला. व्यासपीठावर जावून भाषणाला सुरुवात केली. जमलेल्या लोकांना स्वातंत्र्य लढयाविषयी स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले. महात्मा गांधीच्या बद्दल माहिती सांगितली. कॉंग्रेस पक्षाच्या कार्याची माहीती दिली. लोकांना त्यांनी समजावून सांगितले की, ही वेळ तमाशा बघण्याची नाही 'वंदे मातरम्' म्हणत राष्ट्रगीत म्हणत देश प्रेमाच्या रंगात रंगण्याचे आहे.

देश स्वतंत्र होईल तेव्हा हवी तेवढी करमणूक करुन घ्यायला भरपूर वेळ असेल शेवटी स्वत:हुन त्यांनी घोषणा दिल्या लोकांनीही त्यांना चांगला प्रतिसाद दिला. अशा प्रकारे पांडू मास्तर मिळेल त्या व्यासपीठावरुन लोकांना स्वातंत्र्य लढयात भाग घेण्यास प्रवृत्त करत असंत.

तमाशाच्या मालकाला पुढे बोलवून घेतले. त्याला सत्यशोधक तमाशाच्या धरतीवर तमाशा तयार करावयाला सांगितला. वीरपुरुषांचे, देशभक्तांचे पोवाडे गायला सांगितले. राष्ट्रप्रेम वाढविणारे वग तयार करणेस सांगितले.[६]

पांडू मास्तरांचे वजन, त्यांचा दबदबा असा होता की, तेवढया प्रचंड जनसमुदायातल्या एकाही माणसाला पाडू मास्तरांना विरोध करावयाची छाती झाली नाही. तमाशा बंद पडला म्हणून कुणी राग व्यक्त करावयास पुढे आले नाही. लोक भारतमातेचा, महात्मा गांधीचा जयजयकार करीत तिथुन निघून गेले.

काँग्रेससुवर्ण महोत्सवानिमित्त वाळवा तालुक्यामध्ये विविध कार्यक्रम आयोजित केले होते. १९३५ सालच्या एप्रिल ७ ते १३ पर्यंत हरिजन सप्ताह ऑक्टो.२ ते ९ पर्यंत गांधी सप्ताह इत्यादी कार्यक्रम सुरु होते. हरिजन सप्ताहात सर्व गावांत हरिजन वस्तीसह साफ सफाई करुन त्याच दिवशी सभा घेतली जाई. त्यात अनिष्ठ रुढी व काँग्रेस कार्य हे विषय असत. या कार्यामध्ये पांडू मास्तर आघाडीवर होते ते या सर्व कार्यक्रमांमध्ये भाग घेत असत. गावागावामध्ये जावून काँग्रेसकमेटी स्थापन करणे, काँग्रेसचे सभासद करणे, वेळोवेळी काँग्रेसने केलेल्या ठरावांची माहिती लोकांना देणे, हे कार्य सातत्याने चालू होते. १९३५ दरम्यान शिरटे,येडमच्छिंद्र,रेठरेहरणाक्ष या गावास सायकलवरुन पांडू मास्तर व बर्डे गुरुजी जात असतांना हुबालवाडीजवळ सायकल स्लीप झाली त्यामुळे पांडू मास्तर व बर्डे गुरुजी दोघेही पडले. त्यांच्या तोंडाची कातडी सोलुन ते रक्तबंबाळ झाले तशा परिस्थितीतही ठरलेल्या ठिकाणी जावून त्यांनी सभा घेतली.[७] नाना पाटील यांनी दोघांनाही मलमपटट्टी करुन या अशी विनंती केली परंतु त्यांनी त्यास नकार दिला व प्रथम सभा केली.

प्रत्येक गावात नाना पाटील,बर्डे गुरुजी व पांडू मास्तर हे तीन कार्यकर्ते एकत्र किंवा स्वतंत्रपणे जात. लोकांशी चर्चा करत. काँग्रेसची ध्येय धोरणे सांगत, गावकऱ्यांच्या अडीअडचणी समजावून घेत. १९३० साली जुलै व ऑगस्ट महिन्यात साताऱ्या जिल्हयामध्ये जंगल सत्याग्रह झाले रेठरेहरणाक्ष, पुणदी, येडेमच्छिंद्र,पेठ,कामेरी,बिळाशी, रेठरेधरण या ठिकाणी सत्याग्रह झाले. पांडू मास्त्र यांनी बहूतांशी ठिकाणी सत्याग्रह यशस्वी करण्याचे प्रयत्न केले.[८]

पांडू मास्तर काँगेसचे एक निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून आपल्या नेत्यांनी दिलेल्या आदेशानुसार चळवळीचे विविध कार्यक्रम हिरीरीने पार पाडीत होते. काँग्रेस पक्षाचा प्रसार करण्यात त्यांनी जिवाचे रान केले. काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आणण्याकरीता रात्रीचा दिवस केला. १९३९ साली सातारा जिल्हयात काँग्रेस कमेटीच्या अध्यक्षपदाची निवडणुक आली. आणि यशवंतराव चव्हाणांनी त्यांच्यातर्फे ज्येष्ठ गांधीनिष्ठ कार्यकर्ते म्हणून पांडू मास्तरांचे नाव सुचवले. चव्हाणांच्या विरोधातल्या कॉंग्रेसमधल्याच एका गटाने रॉयसाहेबांच्या अध्यक्षतेखाली तासगांव येथे भरलेली राजकीय सभा उधळुन लावली होती. त्या गटाने पांडू मास्तरांचा पराभव केला आणि सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून शंकरराव पवार यांना निवडून दिले.

पराभवाने पांडू मास्तर नाराज झाले नाहीत कुठल्या पदासाठी ते काँग्रेसचे कार्य करीत नव्हते. कसलेही पद नसतानांही एक सामान्य कार्यकर्ता म्हणून देशकार्य करीत होते. परंतु त्यांनी पुन्हा कुठल्याही पदासांठी निवडणूक लढवावयाची नाही असा मनोमन निर्णय घेतला.[९]

मास्तरांना १९३०सालच्या कायदेभंग चळवळीत पहिली अटक झाली होती. जंगल सत्याग्रहाची तयारी चालू असतांनाच पोलीसांनी त्यांना पकडून नेलं होत. पण पुढे गांधी आयर्विन करारामुळे सार्वत्रिक माफीने खटला रदद् होवून त्याची सुटका झाली होती. पुन्हा १९३२ ला सरकारनं त्याला दोन महिने स्थानबद् केलं होतं. त्यातून सुटका होताच मास्तर

पुन्हा सभा मिरवणुकात भाग घेवू लागले तेव्हा परत ब्रिटीश सरकारनं त्यांना अटक करून नऊ महिने सक्तमजूरी व शंभर रुपये दंड अशी शिक्षा दिली होती. १९३७ साली बोरगावचे आत्माराम पाटील, विधानसभेचे काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणूकीला उभे होते. त्यांच्यासाठी पांडू मास्तरांनी अनेक प्रचार सभा घेतल्या. त्यासाठी कधी पायी, कधी बैलगाडीनं तर कधी सायकलनं प्रवास करुन खेडोपाडी प्रचार केला होता. [१०]

सातारा जिल्हयातील इतर कार्यकर्त्याबरोबर पांडू मास्तर ८ ऑगष्ट १९४२ रोजी मुंबईला अधिवेशनास उपस्थित होते. 'चले जाव' या घोषणेने अधिवेशनाची समाप्ती झाली. लगेचच सरकारने पुढाऱ्यांना अटक करायला सुरुवात केली. पांडू मास्तर मुंबईहून तालुक्यात दाखल झाले. त्यांनी आणि वाळवे,शिराळा तालुक्यातील त्यांच्या सहकाऱ्यांनी भूमिगत राहून चळवळीचे कार्य करावयाचे ठरवले.

निरोधने,मोर्चे,सत्याग्रह,हरताळ,प्रभातफेऱ्या यांचा धुमधडाका चालू झाला. पांडू मास्तर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वाळवा,शिराळा तालुक्यात सभा घेऊन चांगलेच वातावरण तापवले. एक दिवस मास्तर,हिंदुराव पाटील व ईश्वरा गुरव यांना बरोबर घेऊन कामेरीला गेले. तेथे चंद्रोजी पाटील आणि के.डी.पाटील यांच्याशी सल्ला-मसलत केली. मल्लीकार्जुन डोंगरावरची सभा आणि मामलेदार कचेरीवरचा मोर्चा यांच्या आयोजना बद्दल चर्चा करुन काही निर्णय घेतले.

आता पांडू मास्तरांना एकच ध्यास लागला होता. एकाच गोष्टीचे वेध लागले होते. दहा सप्टेंबरचा इस्लामपूरचा मामलेदार कचेरीवर प्रचंड संख्येने माणसे जमवून मोर्चा न्यायचा आणि कचेरीवर तिरंगा ध्वज फडकावायचा आणि ब्रिटीश सत्ता संपल्याचं जाहीर करायचं.

इस्लामपूरच्या मोर्चाचे नियोजन काळजीपूर्वक करण्यात आले होते. परंतु अंमलबजावणी मात्र वेंधळेपणाने करण्यात आली. मोर्चाला पाठींबा मिळविण्यासाठी

आवश्यक म्हणून जो प्रचार करावयाचा त्याकरीता कार्यकर्त्यानी गावाची सोईस्कर विभागणी केली होती. किर्लोस्करवाडी, बुर्ली, आमणापुर, खेड, पुणदी ही गावे नाना पाटील यांच्याकडे सोपविण्यात आली. पांडू मास्तर, के.डी.पाटील, आर.के.उर्फ चंद्रोजी पाटील , दत्तु पाटील, उरुणकर, रंगराव पाटील आणि ईश्वरा गुरव यांच्याकडे दक्षिण आणि पश्चिमेकडील गावांची जबाबदरी सोपविण्यात आली. शिवाय नाना पाटील, पांडू मास्तर, नागनाथ नायकवडी, गोविंदराव खोत व इतर कार्यकर्त्यानी वाळवा, तासगांव, कराड, खानापूर तालुक्यातील व शिराळा पेठेतील गावे प्रचार करुन पिंजून काढली. सभा घेतल्या, प्रभातफेऱ्या काढल्या, लोकांच्या व्यक्तीगत भेटी-गाठी घेतल्या हा मोर्चा संघटित करण्यात यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व इतर कार्यकर्त्यांनी भाग घेतला होता. मोर्चाच्या आदल्या रात्री यशवंतराव चव्हाण मोर्चाचा तपशील ठरवण्यासाठी किर्लोस्करवाडी येथे मुक्कामास होते. पांडू मास्तर, निवृत्ती आकाराम पाटील उर्फ निवृत्ती काका, रंगराव पाटील, वसंतदादा पाटील, के.डी.पाटील, यांनी ७ सप्टेंबर, १९४२ रोजी दुपारी २ ते ४ या वेळांत मल्लीकार्जून टेकडीवर साधारणतः ३००० ते ३५००लोकांची सभा घेतली. [११] या लोकांपैकी साधारणतः १००० लोकांच्याजवळ काठया-कुऱ्हाडी , भाले वगैरे शस्त्रे होती या सभेत नेत्यांनी राजकीय परिस्थितीचा उहापोह केल्यानंतर लोकांना असे आवाहन केले की, येत्या ३ ते ४ दिवसात इस्लामपूर कचेरीवर मोर्चा काढण्यात येणार आहे. तरी सर्वानी काठया-कुऱ्हाडी, भाले वगैरे शस्त्रे घेऊन नियोजीत मोर्चात सामील व्हावे.

वडूजच्या कचेरीवर ९ सप्टेंबर रोजी शांततेने काढलेल्या मोर्चावर अमानुष गोळीबार करण्यात आला. त्यात आठ काँग्रेस कार्यकर्ते हुतात्मे झाले व २३ कार्यकर्ते जबर जखमी झाले. या बातमीने इस्लामपूर कचेरीवर काढण्यात येणाऱ्या मोर्चाच्या नेत्यांचे व इतरांचे मनोधैर्य खचले नाही. उलट वडूज येथे स्वातंत्र्यसैनिकांचे रक्त सांडले. याची त्यांना चीड आली, त्यांची डोकी भडकली मोर्चा काढण्याचा निर्धार अधिक दृढ झाला. त्यांच्या मनात

ब्रिटिश सरकारविषयी व्देष मावत नव्हता ' करेंगे या मरेंगे ' या मंत्राने कार्यकर्ते बेछूट व बेडर झाले होते. मृत्यूचे भय त्यांनी कधीच झटकून टाकले होते.

आपल्या २० ऑगष्ट, १९४२ च्या दैनिक अहवालात सातारच्या डी.एस.पी. ने सातारच्या डिस्ट्रीक मॅजिस्ट्रेटला असे कळविले, असा बोभाटा आहे की वाळवा तालूक्यातील काँग्रेस कार्यकर्ते इस्लामपूरात चळवळ करणार आहेत. आणि त्यांच्या बरोबर गुन्हेगार प्रवृत्तीचे गुंड असतील. अशीही शक्यता आहे की, ते सर्वजण प्राणघातक शस्त्रे बरोबर घेऊन येतील. आणि स्थानिक शासकीय कर्मचाऱ्यांना मारहाण करतील. १० सप्टेंबर, रोजी इस्लामपूरात मामलेदार कचेरीवर हल्ला करण्यात येणार आहे. ही खबर त्याने सातारच्या डी.एस.पी. ला १० सप्टेंबर रोजी पहाटे तीन वाजता दिली. परिणामी नियोजीत मोर्चा मोडून काढण्यासाठी डी.एस.पी. ने आधीच पक्का बंदोबस्त केला. या डी.एस.पी. चे नाव सी.एम.एस.एट्स असे होते. तो स्वत: इस्लामपूरला बंदोबस्तावर देखरेख करण्यासाठी दाखल झाला होता. अर्थातच याची कल्पना मोर्चेवाल्यांना नव्हती. गटागटाने शेतकरी, विद्यार्थी , तरूण १० सप्टेंबरच्या सकाळी गावागावातून बाहेर पडले व त्यांनी इस्लामपूरचा मार्ग धरला.

इस्लामपूरच्या मार्गावर निरनिराळया गावाहून येणारे लोकांचे गट एकमेकांना भेटत आणि एकमेकांचे स्वागत करावे म्हणून उत्स्फुर्तपणे 'महात्मा गांधी की जय ' ' भारत माता की जय ' वगैरे घोषण देत. त्या सर्वांच्या डोक्यावर गांधी टोप्या होत्या. हातात काँग्रेसचे तिरंगी झेंडे होते. दुपारी साधारण एक वाजता पुणदी येथे मोठा जमाव नावेने नदी पार करीत होता. हा मार्ग कुंडलहून येणारा होता. जेव्हा इस्लामपूरच्या पूर्वेकडून येणारे मोर्चावाले पुणदीच्या हददीतून जूनेखेड च्या हददीस पोहचले तेव्हा त्यांनी एकमताने असे ठरविले की, नाना पाटील व इतरांची अकस्मित अटक टाळण्यासाठी त्यांनी तेथेच थांबावे.[१२]

१० सप्टेंबरला गुरूवार होता. इस्लामपूरचा आठवडयाचा बाजारचा दिवस असल्यामूळे आसपासच्या खेडयातून खूप लोक बाजारासाठी आले होते. सकाळपासून मोर्चेवाले गटागटाने निरनिराळ्या दिशांनी इस्लामपूरात येऊन धडकत होते. परंतू एकूण नियोजनात समन्वयाचा व एकाच वेळी करावयाच्या कृतीचा अभाव दिसून आला. सर्व मोर्चेवाले विशिष्ठ ठिकाणी जमले नाहीत व एकाच वेळी मिरवणूक काढून कचेरीवर चाल करून गेले नाहीत. अगदी शेवटच्या क्षणी कोठेतरी काही चुकल्यासारखे दिसते. पांडू मास्तर हे सर्वांचे नेते ते दोन हजार लोकांना बरोबर घेऊन सर्वांआधी इस्लामपूरात पोहचले. निरनिराळया दिशांनी येणाऱ्या मोर्चेवाल्यांची वाट त्यांनी पाहिली नाही. आपल्या बरोबर आणलेल्या लोकांना एकत्र ठेवण्यास गांधी चौकात सभा घेण्याची कल्पना त्यांना सुचली असावी. गांधी चौकात सभा भरविली ते दहा ते पंधरा मिनिटे बोलताहेत न बोलताहेत तोच डी.एस.पी. दळवी, पी.एस.आय आणि सशस्त्र पोलीस पार्टी सभेत घूसली. आणि कोणतीही पूर्वसूचना न देता लोक पांगवण्यासाठी त्यांनी लाठीमार केला. लाठीमारामुळे इतरांबरोबर पांडू मास्तरांनाही जखमा झाल्या. त्यांना अटक करण्यात आली व पोलीस चौकीत फरफटत नेण्यात आले. फरफटत ओढून नेत असताना त्यांनी लोकांना शांतपणे निघून जा असे आवाहन केले. आणि लोकांनी पोलीसांच्या कृतीने प्रक्षूब्ध न होता पांडू मास्तरांच्या आवाहनाला मान दिला.[१३]

यावेळी गोविंदराव खोत यांच्या नेतृत्वाखाली येणारा तीन हजार लोकांचा मोर्चा इस्लामपूरापासून एक मैल दूर होता. जेव्हा या मोर्चे वाल्यांना इस्लामपूर येथे घडलेला प्रकार कळाला तेंव्हा त्यांच्यात संतापाची लाट पसरली व ते जलद गतीने थेट कचेरीवर चालून गेले. कचेरीच्या गेट बाहेर डी.एस.पी., पी.एस.आय., व्ही.एस. कूलकर्णी नावाचे मामलेदार सशस्त्र पोलीस दलासह उभे होते. मामलेदार आणि पी.एस.आय. मोर्चेवाल्यांकडे गेले व त्यांनी त्यांना तेथेच थांबा असे सांगीतले आणि त्यांच्या तक्रारीची चौकशी केली. मोर्चेवाल्यांच्या डोक्यात व्देष मावत नव्हता. त्यांना फालतू चर्चेत स्वारस्य नव्हते. त्यांनी

पांडू मास्तरांची ताबडतोब सूटका करावी अशी मागणी केली. परंतू ही मागणी सरळ फेळाळून लावण्यात आली. या नकारामूळे मोर्चेवाल्यांची डोकी भडकली. ते बेभान झाले त्यांनी गोफणीने व हाताने पोलीसांवर दगड फेकण्यास सुरवात केली. याचा प्रसाद डी.एस.पी., मामलेदार, पी.एस.आय. आणि कॉन्स्टेबलसना मिळाला. पोलीस स्टेशनच्या सात खिडक्यांच्या काचा फुटल्या. हे पोलीस स्टेशन मामलेदार कचेरीच्या एका भागात होते. खरेतर मालमत्तेची तशी गंभीर नासधूस झाली नव्हती. दगडफेकीमुळे डी.एस.पी.चा आपल्या मनावरील ताबा सुटला आणि ते मोठयाने ओरडून मोर्चेवाल्यांना म्हणाले 'तुम्हाला काय हवे आहे ?' किर्लोस्कर आयर्न वर्क्स मधील उमाशंकर पांडे नावाचा इंजिनिअर डी.एस.पी.च्या पुढे उभा होता. तो उत्स्फुर्तपणे उत्तरादाखल म्हणाला, 'स्वराज्य !' या उत्तराने डी.एस.पी.चा संताप अनावर झाला. 'हे घे स्वराज्य' असे म्हणून त्याने क्षणार्धात पांडेला गोळी घालून ठार केले. आणि पोलीसांना मोर्चावर गोळीबार करण्याचा हुकूम दिला. पोलीसांनी एकूण सोळा गोळया झाडल्या. त्यात कामेरीचे विष्णू खंडू बारपटट्े बळी पडले. पाच लोकांना मोठया जखमा झाल्या. आणि अनेकांना किरकोळ जखमा झाल्या.[१४]

पांडू मास्तरांना येरवडा येथील केंद्रीय तुरूंगात ठेवले. तुरूंगामध्ये ते अस्वस्थ होते. बाहेरच्या चळवळीसंबंधी विचार करीत होते. तुरूंगातून निसटण्याच्या संधीची ते वाट पहात होते. त्यांच्या बरोबर या पध्दतीनेही किसनवीर विचार करीत होते. पांडू मास्तर, किसनवीर, छन्नूसींग चंदेले, कॉम्रेड विभूते, बलदेवसिंग प्रसाद यांनी तुरूंगातून निसटण्याचा कट रचला. तटाला लावण्यासाठी शिडीची व्यवस्था आदल्या दिवशी करून ठेवली. ठरल्याप्रमाणे १ नोव्हेंबर, १९४२ रोजी पांडू मास्तर यांनी तुरूंग फोडला.[१५] पांडू मास्तर व किसनवीर पोलीसांना झुकांडया देत व प्रवासात संकटांना तोंड देत कवठयाला पोहचले तेथून पांडू मास्तर त्यांच्या गावी येडेनिपाणी येथे गेले.

पांडू मास्तर नव्या जोमाने कामाला लागले. पोलीस त्यांच्या पाठीमागे होते. तालुक्यामध्ये चळवळीने फार जोर धरल्यावर इंग्रजांनी बऱ्याच नेते मंडळींना पकडून

देणाऱ्यास किंवा मदत करणाऱ्यास बक्षीसं जाहीर केली. त्यामध्ये पांडू मास्तरांचेही नाव होते. त्यांच्यासाठी सरकारने एक हजार रूपये बक्षीस जाहीर केले होते.

सातारा जिल्हयामध्ये प्रतिसरकारची स्थापना झाल्यानंतर, कोल्हापूर पासून पाली पर्यंत पांडू मास्तर यांच्या नेतृत्वाखाली २५० सभा घेण्यात आल्या. ग्रामराज्य स्थापने, ब्रिटीशांविरूध्द लढा करावा, छापा आला असता गावाचे संरक्षण करणे वगैरे कार्याचा प्रचार केला. सोनावडे येथे दारूबंदी हितोपदेश देऊन ५०० घागरी रसायन ओतून शिंदेवाडीच्या दारूच्या घागरी ओतल्या, चाफळ खोऱ्यात दारूबंदी केली. नार्णेगाव येथील २ - ३ दरोडे पकडून दिले. कुद्रे, कारळे, उंबरकांचन, साईंगडे या भागात व इतर आसपासचे भागात दारूबंदी केली. मानेवाडी येथील १००० रूपये वसूल केले. तेथील मुलांना दिले.[१६]

कामेरीच्या सखाराम बारपट्टे नावाचा एक गुंड व दरोडेखोर होता. त्याचे एव वैशिष्ट्य होत की, तो सर्वसामान्य माणसाला त्रास देत नव्हता. पांडू मास्तरांनी याची ताकद चळवळीसाठी वापरावयाची ठरवली. आण्णा गुरूजींना घेऊन ते एका रात्री मल्लीकार्जून डोंगरावर गेले. बराचवेळ चर्चा केल्यानंतर पांडू मास्तरांनी सखारामला चळवळीत भाग घेण्यास प्रवृत्त केलं.

वसंतराव दादांनी धोंडीराम माळी यांना गोव्याला हत्यार आणण्याकरीता पाठवलं होत. ते कोल्हापूरात येणार होते. म्हणून वसंतराव दादांनी, पांडू मास्तर, रंगराव दादा व हिंदूराव पाटील यांना कोल्हापूरला बोलवल होत. एका हॉटेलमध्ये चौघेजण जेवण घेत होती, जेवताना पैसा कसा जमवायचा याचा विचार चालू होता. तोच पोलीसांनी त्यांच्यावर छापा टाकून अटक केली. पोलीस पांडू मास्तरांच्या मागावर होते. तिघांना कोल्हापूर पोलीसांच्या ताब्यात देऊन पांडू मास्तर यांची रवानगी येरवडा तुरूंगात केली.

चार महिने सक्तमजूरीची शिक्षा भोगून ऑगष्ट ४३ मध्ये पांडू मास्तर तुरूंगातून बाहेर आले. तालुक्यात येताच सहकाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांनी कार्यरंभ केला.

पांडू मास्तर करंजवडयाला गेले होते. तिथं त्यांना एक मिलीटरीतला माणूस रिव्हॉलवर विकत देतो म्हणाला, पांडू मास्तरांनी रिव्हॉलवर घ्यावयाची ठरविली. त्यांनी ती इच्छा ईश्वरा गुरव यांना सांगितली. येडेनिपाणीला परत जात असताना त्यांना एक पोस्टमन भेटला. त्याला दोघांनी अडवून त्याच्या जवळचे १७ रूपये मनिऑर्डरचे घेतले. तरीपण हत्यारासाठी ते पैसे फार अपूरे होते. दुसरा कोणता मार्ग नव्हता म्हणून पांडू मास्तरांना न सांगताच ईश्वरा गुरव यांनी मल्लोकार्जून देवळातला देव विकून पांडू मास्तरांना पैसे आणून दिले. लोकांना समजताच लोक जाब विचारायला आले. मास्तर समजून सांगत असतानाच पोलीस गाडी आली. पोलीसांनी त्यांना पकडल, पांडू मास्तरांनी पत्नीच्या भेटीची इच्छा व्यक्त केली. फौजदारान मान्य केली. घरी गेले पत्नीला चहा करायला सांगीतला व पाठीमागच्या दाराने पळून गेले. [१७]

२० मार्च, १९४४ ला शिराळे पेठयातील मिरूरण्याची वाडी येथे ९० भूमीगत कार्यकर्ते जमून त्यांची सभा झाली. त्यामंध्ये किसनवीर यांना डिक्टेटर नेमण्यात आले. या सभेमध्ये ग्रामराज्याच्या संबंधी विचार विनिमय करण्यात आला. कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. याचवेळी तीन सुपरवायझरही नेमण्यात आले. पश्चिम भागाची जबाबदारी पांडू मास्तर यांच्यावर टाकण्यात आली.[१८] ही जबाबदारी पांडू मास्तरनी यशस्वीरित्या पार पाडली.

तालुक्यामध्ये तारा तोडण्याचे व त्याचं डांब मोडून टाकण्याचे ठरले होते. पांडू मास्तर व त्यांच्या सहकारी यांच्यावर कामेरी ते तांदुळवाडी या दरम्यानची जबाबदारी होती. [१९] एकाच रात्री सातारा ते कोल्हापूर संस्थानांच्या हददी पर्यंत एकाच वेळी तारा तोडून व डांब मोडून ब्रिटीश सरकारला धक्का देण्याचा भूमिगतांचा विचार होता. पांडू मास्तर, चंद्रू कारभारी व इतर नेते आपल्या कार्यकर्त्यांबरोबर काटया व कासरे घेवून आले. कासरे तारेवर टाकले सगळयांनी दोर दोन्ही टोकांनी धरून ओढली. तारा तुटू लागल्या,

खांब पोकळ असल्यानं ऊस मोडावा तसे ते काडकण मोडून पडले. एकाच रात्री शेकडो मैलाच्या तारा तोडण्यात आल्या.

तालुक्यामध्ये चळवळ जास्त प्रभावी होत असल्यामुळे सातारचे डिस्ट्रिक्ट सुपरिटेंडेन्ट ऑफ पोलीस बी.जे.हॉन्सन यांच्यामार्फत २१ जून, १९४४ रोजी ४२,५०० रूपयांचे बक्षीस जाहीर करून भूम्गित पकडून मिळावेत म्हणून जनतेस अवाहन केले होते. त्यामध्ये पांडू मास्तर यांच्यावर १०००रूपयांचे बक्षीस जाहीर केले होते. [२०]

समाज निरोगी ठेवण्याकरीता पांडू मास्तर यांनी नशाबंदीचा कार्यक्रम राबविला. अनेक ठिकाणचे दारूचे अड्डे बंद पाडले. काही वेळा समजावून सांगून तर काही वेळा दंडूकशाही वापरून ही मोहीम फत्ते केली. त्यानंतर पांडू मास्तर काही काळ नाना पाटलांच्या बरोबर राहिले. प्रतिसरकारच्या प्रयोगातला गांधीलग्न हा एक महत्वाचा भाग होता. लोकांच्यामध्ये जन-जागृती करण्याचा प्रयत्न केला.

ऑगष्ट व सप्टेंबर ४५ मध्ये बरेच जणांना अटक झाली. त्यामुळे आंदोलन थंडावेल ही सरकारची अपेक्षा होती. परंतू त्यांचा तो भ्रमनिराश झाला. परंतू मास्तर यांनी आपल्या उरलेल्या सहका-यांना बरोबर घेऊन वाळवा, पाटण, शिराळा, कराड या तालुक्यात जन आंदोलनाचे काम पाहू लागले. [२१]

काव्यांचे पाटील आणि तलाठी यांनी गावकऱ्यांचा छळ चालविला होता. सरकारी धान्य वसुलीचे काम करताना गावकऱ्यांवर जुलूम, जबरदस्ती करीत होते. या जुलमी कारभाराने गांजलेल्या लोकांनी क्रांतीकारकांच्या प्रतिसरकारकडे आपले गाऱ्हाणे नेले होते. त्यासाठी पांडू मास्तर आपल्या सहकाऱ्यांसमवेत काव्यांत गेले. संध्याकाळी दोघांना बोलावून घेतलं. गावकरी जमले होते . दोघेही गुर्मीत आली. पांडू मास्तरांना त्यांच्यावरचे आरोप सांगीतले. त्यावर पाटलानं सांगितले की, तुम्हाला हे विचारायचा अधिकार नाही. पांडू मास्तर भडकले 'इथे सरकार आहे आम्हा कॉंग्रेस लोकांच हे सरकार तुइया सारख्या ब्रिटीशांना गोळया घालायला मागंपूढं बघणार नाही. हे ध्यानात घेऊन बोला.' तलाठी व

पाटील मानायला तयार नव्हते. शेवटी पांडू मास्तरांनी आपल्या सहकाऱ्यांना पाय बांधून पत्री मारण्याचा आदेश दिला. त्याच दरम्यान गावात पोलीस येत आहेत याची माहीती मास्तरांना मिळाली. मास्तरांनी दरबार बरखास्त केला व त्या दोघांना घेऊन ते गावाबाहेर पडले. पूर्ण गावाचा तपास केला मास्तर कुठेही सापडले नाहीत. यावेळेस पांडू मास्तरांना पकडण्यासाठी तिसऱ्यांदा बक्षीस जाहीर करण्यात आल अशा रीतीने प्रत्येक गावामध्ये जाऊन प्रतिसरकारच काम पांडू मास्तर बघत असत.[२२] प्रश्न फेकून त्याची सोडवणूक करीत.

पांडू मास्तर हा शब्द प्रयोग पोलीसांना घाम फोडत. त्यांनी चांगलाच दरारा निर्माण केला होता. त्यामुळे तरूण पिढीला त्यांच्याबददल जबरदस्त आकर्षण वाटत असे. त्यांच्या सभांना तरूण मंडळी गर्दी करतत्र शिवाय त्यांच्या कार्यात सहभागी होण्यासाठी ते सदैव मोठया संख्येने आणि उत्साहाने उपस्थित रहात.

पांडू मास्तरांनी जी देश सेवा केली त्यामध्ये त्यांची पत्नी गिताई यांचा फार मोठा वाटा आहे. अगदी सुरवातीच्या काळात या लढयात उडी घ्यावयाची हा विचार चालू होता. त्यावेळी त्यांच्या पत्नीने जर प्रोत्साहन दिल नसते तर कदाचीत पांडू मास्तर देशभक्त होउ शकले नसते. १९४२ च्या लढयात गिताईनीं प्रत्यक्ष चळवळीस भाग घ्यायला सुरवात केली. पांडू मास्तरांना पकडण्यासाठी पोलीसांनी गिताईनां मारहाण केली. परंतू गिताईंनी कोणत्याही प्रकारची तक्रार पांडू मास्तरांकडे केली नाही. त्यांना आपल्या नवऱ्या बददल अभिमान होता.

पांडू मास्तर स्पष्ट बोलणारे होते. एखादी गोष्ट पटली नाही तर ते स्पष्टपणे बोलून दाखवत. अनेक वेळा त्यांचे व चळवळीतील नेते मंडळीचें खटके उडत. परंतू त्यांचा हेतू शुध्द असायचा, कोणत्याही पध्दतीने कुटील राजकारण त्यांनी केले नाही. एखादयाला दंड केला आणि तो नाही म्हणाला तर तो दंड ते वाढवून बोलायचे आणि वसूल करायचे.[२३]

सार्वत्रिक माफी जाहीर झाल्यानंतर १९४६ मध्ये सगळे नेते प्रकट झाले. पांडू मास्तरांचेही वॉरंट रदद् झाल्यानंतर तेही प्रकट झाले. तरी प्रतिसरकारचे कार्य चालू राहिले होते. १४ ऑगष्ट, १९४७ च्या रात्री सारा देश जागा होता. कारण देशाला शेवटी गुलामीची रात्र उलटताना आणि स्वातंत्र्याचा सूर्य उगवताना पहायचा होता. कित्येक स्वातंत्र सैनिकांना हा दिवस पहायला मिळेल का नाही याची खात्री नव्हती. पांडू मास्तरांना हे भाग्य लाभले होते. पांडू मास्तर रात्रभर त्यांच्या आठवणींनी व्याकूळ होत होते. आणि स्वातंत्र्य मिळत असल्याचा त्यांना अपार आनंदही होत होता. सगळ गाव चावडीसमोर जमलं होत. वंदे मातरम्, भारत माता की जय, महात्मा गांधी की जय अशा घोषणांनी आसमंत दुमदुमत होता.

मध्यरात्र उलटण्याच्या क्षणी पांडू मास्तरांनी येडेनिपाणीच्या चावडी चौकात ध्वजारोहण केलं. तिरंगा ध्वज उंच-उंच जाऊन डोलात फडकू लागला.[२४]

## क्रांतीवीर नागनाथ नायकवडी :

नागनाथ नायकवडी यांचा जन्म १५ ऑगष्ट, १९२२ रोजी झाला. त्यांचे वडील रामचंद्र नायकवडी व आई लक्ष्मीबाई यांना दोन मुले झाली. नागनाथ आणांना त्यांच्या आईने लहानपणापासून समाजसेवा, देशसेवा, अन्यायाविरूध्द बंड करणे याच बाळकडू पाजलं होत. त्यांच्या मातोश्रींचा खरा पिंड राजकारणी आहे. त्यामूळे राजकारणाचे धडे ती आपल्या मुलाला शिकवत होती. आण्णांच ५ वी पर्यंतचे शिक्षण जन्मगावी (वाळव्यात) झाले. आणि ६ वी ७ वीच्या शिक्षणासाठी त्यांना आष्टा शाळा नं. १ च्या शाळेत घातले. या शैक्षणिक जीवनात त्यांच्या मनात देशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम, समाजसेवा, गरीबांबददल प्रेम, शिक्षणाचे महत्व व इंग्रज सरकारचा अन्याय या गोष्टी हृदयात खोलपर्यंत रूजल्या.[२५]

८ ऑगष्ट, १९४२ ला मुंबईच्या गवालीया टँकवर म. गांधीनी चलेजावची घोषणा केली. स्वातंत्र्यासाठी लाखो तरूणांनी यात भाग घेतला. आण्णांनीही शिक्षण सोडून देवून या आंदोलनात भाग घेतला. इंग्रज राज्य खिळखिळे करण्यासाठी सुभाषबाबूंच्या तत्त्वाप्रमाणे 'ठोश्यास ठोसा द्यायचा'' असा चंग बांधला. यासाठी ४०० ते ५०० जवानांची फौज बांधली. तारा तोडणे, पोष्ट जाळणे, रेल्वे पाडणे, पोलीस ठाण्यावर छापा घालणे, गुंडांचा नायनाट करणे, शेतसारा बंद करणे स्वातंत्र्य सैनिकांना मार्गदर्शन करणे, प्रतिसरकार स्थापन करणे, कचेरीवर झेंडा लावणे अशी अनेक कामे या काळात त्यांनी केली.

छोडो भारतचा इशारा होताच ब्रिटिश सरकारने प्रमुख नेत्यांची धरपकड केली . या धरपकडीबरोबर सारा हिंदूस्थान ब्रिटिशांविरूध्द पेटून उठला. ब्रिटीशांविरूध्दच्या या संघर्षास लोकलढयाचे स्वरूप प्राप्त झाले. सातारा जिल्हयात तर या लढयाचे उग्र आंदोलनात रूपांतर झाले. सरकारने जोरदार दडपशाही सुरू केली सरकारच्या अन्यायी धोरणाचा निषेध करून १९ फेब्रूवारी, १९४३ रोजी गांधीजींनी २१ दिवसांच्या उपोषणास सुरूवात केली. सातारच्या लोकांचे गांधीजींवर प्राणांपलीकडे प्रेम होते. त्यांच्या उपोषणामुळे साताऱ्यातील आंदोलनाचा वेग कमी झाला. दिवसेंदिवस ढासळणाऱ्या त्यांच्या तब्येतीमुळे साताऱ्यातील

भूमिगत कार्यकर्ते चिंताग्रस्त झाले. आंदोलनाचे मार्गदर्शन करण्याच्या मन:स्थितीत कोणीही नव्हते. ही अवस्था उपोषण सोडल्यावरही काही काळ तशीच होती. फेब्रुवारी ते मे १९४३ या दरम्यान उल्लेखनीय असे काही घडले नाही. मार्च १९४३ च्या पहिल्या आठवड्यात विद्यमान परिस्थितीवर विचार करण्यासाठी नाना पाटील व त्यांचे भूमिगत सहकारी एकत्र आले. नागनाथ नायकवडी व जी.डी.लाड यांनी या बैठकीत गानिमी युध्द करण्यासाठी शस्त्रास्त्रे व दारुगोळा मिळवण्याची परवानगी मिळवली.[२६]

या लढयामध्ये क्रांतीसिंह नाना पाटील व क्रांतीवीर नागनाथ आण्णा हे प्रतिसरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने वरचेवर राजाभुजाचे सपाट (मल्लीकार्जून डोंगराजवळ) मिटींगा घेत होते. १ सप्टेंबर, १९४३ रोजी कामेरी येथे 'प्रतिसरकार' स्थापण्याच्या हेतूने व्यापक बैठक बोलावण्यात आली. या बैठकीत फितूरांचा बंदोबस्त करणे, गरीबांना न्याय देणे, गावातील अनिष्ट प्रथा दुर करणे, गावागावात सभा घेऊन न्यायदान मंडळ भरवणे अशा तऱ्हेचे विचार प्रदर्शित करण्यात आले. दे.भ.बर्डे गुरूजी, वैद्य धन्वंतरी, डी.जी. देशपांडे, नागनाथ नायकवडी, वाय.सी. पाटील, बाबूराव कोकाटे, जी.डी.लाड, घोरपडे मास्तर, बाबूजी पाटणकर, बाबूराव चरणकर, किसन अहिर इ. अनेक कार्यकर्ते हजर होते. प्रतिसरकारच्या उभारणीमध्ये ग्रामस्वराज्याची कल्पना स्पष्ट होती. ग्रामस्वराज्य उभे करायचे तर पैसा पाहिजे. पण हा पैसा आणायचा कोठून? त्यासाठी सरकारी बंगल्यावर दरोडे घालून सरकारी खजिन्यावर हल्ला मारायचा, ही कल्पना पुढे आली. कोणाच्या घरावर दरोडा घालून खाजगी संपत्ती लुटायची नाही हा निश्चय आणि त्यातूनच नवी दिशा ठरली.[२७]

क्रांतीसिंह नाना पाटील यांना प्रतिसरकारचे प्रमूख पद देवून वेगवेगळया गांवी १८ ग्रुप स्थापन करण्यात आले. त्यात वाळवा ग्रुपचे प्रमुखपद नागनाथ नायकवडी, वाय. सी. पाटील तर उपप्रमुख किसन अहिर, राजमती पाटील यांना देण्यात आले.

गोटखिंडी गावचे ऐक्य नागनाथ आण्णांनी घडवून आणले. परंतू या गावामध्येच नागनाथ आण्णा विधायक कार्य करायला आले असताना (भूमिगत अवस्थेत) गणपतराव पाटील गुरूजींच्या घरी थांबले. ही बातमी कुणा एका दृष्टाने पोलीस ठाण्यावर जावून दिली. डोंगराळ भाग असल्यामुळे नागनाथ आण्णांना पकडण्यासाठी बंदूकधाऱ्या घोडेस्वारांची पार्टी पाठवली होती. त्यांनी सायंकाळी गावाभोवती कडेकोट पहारा दिला. अत्यंत बाका प्रसंग असतानाही आण्णा थोडेही घाबरले नाहीत. गुरूजींच्या कडून त्यांनी सादभाद फाटक, तुटक, जाड भरड धोतर, फेटा व दंडक ही वस्त्रे आणि विळा दोरी या वस्तू जमवल्या. पहाटे उठून त्यांनी व गुरूजींनी शेतकरी दर्जाचा पोशाख केला. कपाळाला गंध, खांदयावर खोरं, हातात विळा व दोरी, पायात पायतान अशा पोशाखांत दोघेही डोंगराच्या दिशेने निघाले. वाटेत एक पोलीस म्हणाला ' अरे ए कोण आहेत ते ? कुठ चाललाय ? ' नागनाथ आपल्या शेतकरी व खेडवळ भाषेत म्हणाले, ''आम्ही कुणबी हाय. बाबा बैलांना गवात कापून आणायला चाललूया. रातभर गुर ढोर उपासपोटी होती आम्हाला लवकर परतायला हवं, जातो आमी'' असे म्हणत ते निघून गेले. डोंगराच्या पायथ्या पायथ्याने त्यांनी अर्ध्या तासाच्या आत नदी पार करून ऐतवडे गावी पोहोचले.

ऐतवडे गावी जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांचा एक मेळावा त्यांनी हाती घेतला होता. ही बातमी कोणीतरी इंग्रज साहेबाला पोहचवली होती. मिटींग संपल्यानंतर राजूताईच्या घरी जेवणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. दारासमोर सोप्यात नागनाथ आण्णा जेवणाकरिता बसले होते. जेवणाचा पहिला घास घेणार तोच बुटांच्या पावलांचा आवाज कानी पडला. नागनाथांनी काहीतरी धोका आहे हे ओळखून घास खाली ठेवला पायरीवर गिलबर्ट साहेब उभा असल्याचे पाहिले. त्याचे एक पाऊल पडताक्षणीच नागनाथ आण्णा चटकन ऊठून परसदाराला गेले आणि मागील दाराच्या तटावरून वाघासारखी उडी घेवून पळत सुटले. सायबान त्यांना ओळखल गिलबर्ट साहेबही उडी मारून तटापलीकडे गेला. तोपर्यंत नागनाथांनी बरीच लांब मजल मारली होती. नागनाथांच्या जवळ शस्त्र नसल्याने

परिस्थिती अतिशय वाईट होती. तरीही त्यांनी धीर न सोडता मोटवणाखाली खोदून ठेवलेल्या गुहेत चटकन लपून बसले. भारतमातेन आपल्या कुशीत त्यांना सुरक्षित लपवले होते. साहेबाची पक्की खात्री झाली की नागनाथ विहीरीतील पाण्यात बुडाला असावा. त्याने बराच वेळ तेथे थांबून खात्री करून घेतली. आण्णांचे इतर साथीदार पसार झाले होते.[२८]

नागनाथ आण्णांच्या जीवनामध्ये ४२ सालच्या लढयात रोमांचकारी राष्ट्रीयत्वाचे व क्रांतीकारी असे अनेक प्रसंग येवून गेले. गिलबर्ट साहेबाला नागनाथ आण्णा सापडले नाहीत. त्यांना पकडण्यासाठी सरकारने पाचशे रूपयाचे दोन वेळा बक्षीस लावले .[२९]

आण्णा ६ महिने घरी येत नव्हते. त्यांची आई त्यांना गुपचूप जेवण पोहचते करायच्या. इंग्रज सरकारने त्यांच्या आईला पत्ता सांगण्यासाठी खूप त्रास दिला. परंतू त्या डगमगलया नाहीत. शेवटी त्यांना कैद केल्यास आण्णा वाळव्यास येतील असे वाटल्या वरून आण्णांच्या आईला कैद केले. येरवडयाच्या जेलमध्ये त्यांची रवानगी केली.[३०] परंतु ३ महिन्यातच त्यांची सुटका करण्यात आली. त्या वाळव्यात आल्यानंतर नागनाथ नायकवडी आईला भेटण्यासाठी जिवलग म्त्रिासह रात्री ११-१२ च्या दरम्यान घरी आले. आईची विचारपूस झाल्यावर रात्री एक-दोनच्या सुमारास मळीकाठी झोपावयास गेले. बरोबरचे मित्र अण्णांना भेटून निघून गेले. रामू मित्रही गावांत मित्रांना भेटण्यास जातो असे सांगून गेला. यानंतर रामूने सरळ आष्टयाचे पोलीस ठाणे गाठले. त्याला आण्णांचे नेतृत्व सहन झाले नाही. त्याने फौजदार साहेबांना भेटून नागनाथ वाळव्यास मळीकाठी असल्याची बातमी दिली. फौजदार सशस्त्र पोलिसांची लॉरी व रामूला घेवून मळीकाठी आले. लॉरी दूर उभी करून हे सर्वजण आण्णा ज्या छपरामध्ये झोपले होते तिकडे निघाले. रामू छप्पर दाखवून आष्टयाला परतला. फौंजदाराने छपराला वेढा दिला. नागनाथ गाढ झोपी गेले होते. फौजदाराने त्यांच्या छातीला पिस्तुलाचा स्पर्श करताक्षणीच नैसर्गिकरित्या त्यांचा हात उशाखाली ठेवलेल्या पिस्तुलाकडे वळला. फौजदाराने पिस्तुलाची मागणी केली. आता

गडबड करण्यात काही अर्थ नाही हे ओळखून आण्णा फौजदाराला म्हणाले 'अरे मी बेसावध बघून असं अडचणीत खिंडित पकडतोस काय ? हं ! हे घे पिस्तुल आणि घाल बेडया असे म्हणून त्यांनी स्वत:हून हात पुढे केला. प्रथम त्यांना तालुका जेलमध्ये तीन चार दिवस ठेवले व अण्णांना दि.२९ जुलै, १९४४ रोजी अटक करुन सातारा जेलमध्ये ठेवण्यात आले.[३१]

सातारा जेलमध्ये दोन-तीन दिवस गेल्यावर आण्णांना राहून राहून वाटू लागले की जेलमध्ये राहून देशकार्य, स्वातंत्र्याची संघटना चळवळ, सरकारबरोबर संग्राम करता येत नाही. आपण जेलमध्ये अडकून राहिलो तर आपल्या साथीदारांचे कार्य थंडावेल, त्यांच्यात फाटाफूट पडेल. पाच सहा वर्षाची शिक्षा भोगत जेलमध्ये पडणे म्हणजे 'जिवंत असून मेल्यासारखे आहे'. म्हणून त्यांनी नरणाला न् भिता मनात फक्त युक्ती योजली ती म्हणजे जेल फोडणे. आपल्या स्वातंत्र्यसैनिक मित्रांना ती बोलून दाखविली. काही ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व कामेरीचे एस.बी.पाटील यांना ही आण्णांची योजना सत्वर पटली. सर्वांनी त्यांना सहकार्य करण्याचे ठरवले. वेळ, काळ, दिवस सर्व काही योजना आखली गेली. या योजनेत बर्डे गुरुजीही सहभागी झाले होते.

१० सप्टेंबर, १९४४ चा तो दिवस पहाटे चार वाजता सर्व कैदयांना मुखमार्जन व आंघोळ यासाठी सोडले होते. ठरल्याप्रमाणे आण्णा आपल्या चार सहकाऱ्यांसह आंघोळ पाणी न् करता जेलमधल्या तटाच्या कडेने शंका न येईल असे फिरु लागले. आण्णांनी न्कळत वर पाहिले. दरम्यान एक पोलिस ओरडला राव वर काय बघताय जेलबिल फोडायचा विचार आहे काय ? हा जेल अद्याप कोणी फोडला नाही व फोडणेही शक्य नाही असे म्हणत तो प्रवेशद्वाराकडे निघून गेला. पुन्हा परत आला नाही.

इकडे आण्णांनी जेल फोडण्यास प्रारंभ केला प्रथम तटाकडे तोंड करुन सशक्त पैलवानास खाली बसवले त्याच्या खांदयावर चौघांना बसवून शेवटी स्वत: वर उभे राहिले. एवढा बोझा घेवून तो पैलवान हळूहळू उभा राहिला. आण्णांचे हात तटावर पोहोचण्यास दोन-तीन इंच उंची कमी पडली. थोडयाशा प्रयत्नाने त्यांना तटाचा वरचा भाग सापडला.

लगेच उशी घेवून ते तटावर जावून बसले. साथीदार लगेच तिथून पसार झाले. आण्णा ज्या बाजूला उडी मारणार होते तो भाग उंचीचा होता. शिवाय शंभर दोनशे मिटर अंतरावर पोलीसांची घरे भरपूर होती. अद्याप कुठल्याही पोलीसाच्या कोठडीचे दार उघडले नव्हते. त्यामुळे आण्णांनी क्षणाचाही विलंब न् करता खाली उडी मारली आणि तिथेच हरळी उपटू लागले. कुणी पाहिले तर हा माणूस गणपतीला हराळी उपटत आहे असे वाटावे. नंतर त्यांनी इकडेतिकडे पाहिले कुणी नाही याची खात्री होताच शहराचा रस्ता धरला. अंगावरील कैद्याचा वेश चटकन बदलणे गरजेचे होते. तटावरच्या काचांनी हाताला रक्त आले होते. सातान्यात कुणाच्या घरी जावे या विचारात ते होते. रस्त्याच्या कडेला एक घर उघडे दिसले. घरगडी झाडलोट करीत होता. आण्णांना दारावर वकील अशी पाटी दिसली. त्यांनी गडयाला विचारले वकीलसाो आहेत काय ? गडयाने सांगितले ते झोपले आहेत. आण्णा आत चौपाळयावर जावून बसले परंतु समोर पंचम जॉर्जचा फोटो पाहून चटकन त्यांनी ओळखले की हे इंग्रज सरकारचे पक्के चाहते असावेत. इथं आपण थांबण म्हणजे स्वत:ला पकडून देण्यासारखं आहे हे त्यांनी ओळखले चटकन त्यांनी गडयाला सांगितले माझे कोर्टाचे काम होते मी परत येतो. आण्णाच्या अंगी दूरदृष्टी, मुत्सददेगिरी, समयसूचकता, हजरजबाबीपणा योग्य व पक्का निर्णय घेण्याची कुवत हे गुण असल्याने ते झटकन त्या घरातून बाहेर पडले.[३२]

आण्णा बेधडक सातारा शहरात घुसले. सकाळचे ६ वाजले असावेत कुणाच्या घरी जावे हा विचार करीत ते चालू लागले. सोमवार पेठेत कर्मवीर अण्णांच्या घराजवळ आले. दारावर पाटी होती, रयत सेवक सोसायटी. आत जावून त्यांनी विचारले आण्णा आहेत का घरात ? आण्णा पुण्याला गेल्याचे समजले. आण्णांनी मावशींना बोर्डिंचे,सुपरिटेंडेंटसाो कोठे राहतात. त्यांना बोलावून घेता का? अशी विनंती केली. मावशींनी एका मुलाकरवी ए.डी.अत्तार साहेबांना बोलावून घेतले. तोपर्यंत आण्णा कॉटवर मच्छरदाणीत गाढ झोपले.

अब्दुलगणी अत्तार येताच त्यांनी आण्णांना पूर्ण संरक्षण दिले. आण्णांना कर्मवीरांच्या घरी न् ठेवता मित्राच्या खोलीवर पाठविले.

आण्णा निसटल्याचे समजताच संपूर्ण सातारा श।हरात बंदोबस्त ठेवण्यात आला. दोघा मित्रांनी आण्णांना सातारा शहराबाहेर काढण्याचे ठरविले. वेषांतर करुन हे तिघेजण बाहेर पडले. साताऱ्यामधील शाहू बोर्डिंगजवळच्या धणिनीच्या बागेच्या पश्चिम दिशेने निघाले. या बाजूची टेकडी त्यांना पार करुन सर्वजण मेढयाच्या रस्त्याला लागले. अर्धा मैल गेल्यावर नदीचा पाणवठा लागला. ती वेळानदी पार करुन काळोशी गावी येलूरचे बोगर गुरुजी रहात होते. त्यांच्या घरी गेले. गुरुजींनी त्यांच्या जेवणाखाण्याची उत्तम व्यवस्था केली. सातारच्या आसपासच्या सर्व गावामध्ये तपास करण्याचा आदेश दिला गेला होता. त्याप्रमाणे मामलेदारांनी पाटलांकडे गावात कोणी नवखे आले आहे याबददल चौकशीही केली. सर्व जिल्हाभर हालचाली सुरु झाल्या त्यामुळे नागनाथ आण्णांना शाळा तपासणारे इन्सपेक्टर साहेब बनवलं होत. बोगर गुरुजींना खरी कल्पना दिली नाही. तुमच्या शाळेचे इन्स्पेक्शन चार सहा दिवसात घेतले जाईल तुम्ही तयारी ठेवा साहेब या भागातच आहेत. एवढीच गुरुजींना सूचना देवून गुरुजींचा निरोप घेवून ते एकीवच्या उंच डोंगराकडे निघाले.

एकीवच्या डोंगरावरील शाळेत वाळवे तालुक्यातील शिगांव गावचे भगवान पाटील शिक्षक होते. गुरुजींची झोपडी गावाच्या बाहेर एकांतात होती. हे तिघेजण सकाळीच गुरुजींच्या घरी गेले. गुरुजींशी साहेबांची (आण्णांची) ओळख करुन दिली. आण्णांना या ठिकाणी बराच काळ ठेवणे भाग असल्यामुळे थोडया इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर खरा प्रकार सांगितला हे साहेब कोण ? त्यांनी काय केले आहे. काय धोका आहे. तुम्ही काय केले पाहिजे ? याची कल्पना दिल्यावर त्यांनी आण्णांच्या सुरक्षिततेची राहण्याची, खाण्यापिण्याची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. भगवान गुरुजींच्या सहवासात आण्णांना ठेवून ते दोघेजण सातारला येण्यासाठी निघाले. यानंतर कासेगांवकर वैदय आण्णांना येवून भेटले. चार दिवसाच्या मुक्कामानंतर कासेगांवकर वैदय, श्री.भ.कृ.पाटील

गुरुजी , नागनाथ आण्णा हे तिघे एकिपच्या (कासचा) डोंगरावरुन पालीमार्गे सज्जनगडच्या पायथ्या जवळून इंदोलीस क्रांतीकारक दिनकरराव निकम यांच्याकडे व पुढे दोघे आपल्या कॅम्पमध्ये पोहोचले.

### शेणोली पे-स्पेशल ट्रेन लुटली - ७ जून, १९४३ :

भूमिगतांना क्रांतीकार्य चालविण्यासाठी आर्थिक अडचण भासत होती. ही अडचण दूर करण्यासाठी त्यांनी सरकारी खजिना लुटण्याचा निर्णय घेतला. त्याचे नियोजन नाथाजी लाड, जी.डी.लाड व नागनाथ नायकवडी यांनी केले. प्रत्यक्ष लुटीत ज्ञानू संतू जाधव उर्फ वस्ताद , शंकर बहिरु पाटील, एस्.बी.शिंदे, बंडू दाजी लाड, महादेव दौलता जगदाळे, भोपाळ पाटील, रामू तात्या, शाम जाधव, किसन जाधव, आप्पा गणू पाटील, व इतरांचे सहकार्य मिळविले. प्रथम त्यांनी स्टेशनची टेहळणी केली. पे-स्पेशल ट्रेन प्रत्येक महिन्याला ठरलेल्या दिवशी ठरलेल्या वेळेला मिरजेहून पुण्याला जात असे. या गाडीवर संरक्षणासाठी सशस्त्र व निःशस्त्र पोलिस गार्ड नेमलेले नव्हते. मात्र सरकारी धोरणानुसार रेल्वेलाईनचे रक्षण करण्यासाठी रात्रंदिवस गँगमन खेडूतांची गस्त सुरु असे.[३३]

सर्व तयारी पूर्ण झाल्यावर तारीख,वेळ,व पे-स्पेशल ट्रेन लुटण्याची जागा निश्चित केली. व सर्व भूमिगतांना एकत्रित करुन सर्वजण ट्रेन लुटीच्या ठिकाणांकडे निघाले. निवडलेली जागा अतिशय चांगली होती. रेल्वे गाडयांची जा-ये करण्यासाठी मेल नं.१५२/८-९ या नंबरात दोन्ही टेकडयांच्या मध्ये खोदलेला एक उघडा बोळ होता. तो कोठूनही दिसत नव्हता. ७ जून, १९४३ रोजी सूर्योदयापूर्वी ४५ ते ५० भूमिगत कार्यकर्ते तेथे दाखल झाले. नियोजन कर्त्यांनी एकूण चार तुकडया केल्या एक तुकडी नाल्यात, दुसरी तुकडी मोरीच्या खाली , तिसरी कॅचवॉटर ट्रेनमध्ये, चौथी तुकडी गस्त घालणाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठवली होती.

पे-स्पेशल ट्रेनवर डी.एल.घिडे नावाचा ड्रायव्हर होता. ७ जून, १९४३ या दिवशी सकाळी ११ वाजून १२ मिनिटांनी पे-स्पेशल गाडी बिचूद स्टेशनात आली. ११ वाजून ३१ मिनिटांनी या गाडीने बिचूद सोडून ती शेणोली स्टेशनकडे धाव घेवू लागली.

भूमिगतांनी गस्तवाल्यांना साधारण दोन फर्लांग अंतरावर पकडले. बोळाच्या पलीकडील बाजूस रुळावर मोठमोठ्या दगडांचा गराडा रचला होता. तो पाहून ड्रायव्हरने गाडी बोळातच थांबवली. ताबडतोब मोरीत लपून बसलेले १५ जण बाहेर आले तिघे वर चढून इंजिनमध्ये आले. त्यांनी ड्रायव्हरला व जाळव्यांना खाली उतरा असा हुकूम दिला. बाकीच्यांनी गाडीला गराडा घातला. काही भूमिगत पे-क्लार्कच्या डब्यात घुसले. पे-क्लार्ककडे पैशाच्या पेट्यांच्या किल्ल्यांची मागणी केली. त्याने नकार देताच त्याला डब्याबाहेर फेकून दिले. पैशाच्या पेट्या गाडीच्या उजव्या बाजूला खाली बाहेर फेकल्या. सर्व मोडून फोडल्या. त्यातील १९,१७५ रु.११आणेची रक्कम हस्तगत केली शिवाय पे-क्लार्क व त्याच्या शिपायाची ४५ रु.किंमतीची मालमत्ता लांबवण्यात आली. ८३५ रु, १धोतर, १बॅटरी, विशेष म्हणजे ७,६३३ रु.१० आणे असलेली पैशाची पेटी भूमिगतांच्या लक्षातच आली नाही. त्यामुळे ती तशीच डब्यात राहिली. गाडी केवळ १० मिनिटात लुटण्यात आली. नंतर सर्व भूमिगत पूर्व दिशेला जवळ असलेल्या टेकडीवर पसार झाले. या सर्व रकमेचा चळवळीसाठी उपयोग करण्यात आला.

**धुळयाच्या खजिन्याची लुट १४ एप्रिल, १९४४ :**

खाणदेशातील धुळे जिल्ह्यातील उत्तमराव पाटील व त्यांच्या पत्नी सौ.लिलाताई पाटील चलेजावच्या आंदोलनात काम करत होते. त्यांचा कुंडल गटाशी संबंध निर्माण झाला. त्यांच्या मदतीने धुळे खजिना लुटण्याची योजना आखली. धुळयाच्या इंपिरियल बँकेतून नंदूरबारला प्रवाशी भाड्याच्या मोटारीने हा खजिना जात असे. नागनाथ आण्णा, जी.डी.(बापू) लाड, निवृत्ती कळके, धोंडीराम माळी, उत्तमराव पाटील यांनी साडेपाच

लाखाचा खजिना लुटण्याची योजना आखून यशस्वी केली. चिमठाणे गाव असलेली जागा गाडी लुंटण्यासाठी निश्चित केली. हे गाव धुळयापासून सुमारे २४ कि.मि. अंतरावर आहे. त्यावेळी तेथे पोलिस सबस्टेशन होते. त्या जागी आठ लोकांतून चार चार जणांचे गट करुन एका गटाने मोटारीवर हल्ला करायचा व दुसऱ्या गटाने पोलिसांना ताब्यात घ्यायचे व खजिना लुटल्यानंतर आसपासच्या गावातून पसार व्हायचे असे ठरले.[३४]

१४ एप्रिल, १९४४ जी.डी. लाड, नागनाथ आण्णा, धोंडीराम माळी, शंकर माळी, असे चौघेजण बसले. त्यांच्याकडे पिस्तुले व काडतुसे होती इतरांना एका मोठया गाडीने धुळयाकडे पाठवण्यात आले. पोलीसाला पैशाचे अमिष दाखवून तो बघत नाही म्हंटल्यावर नागनाथ नायकवडी यांनी पोलीसांवर झडप घालून त्यांची शिटट्री आणि टोपी अगोदर ताब्यात घेतले व इतरांनी त्यांचे तोंड दाबून जमिनीवर लोळविले. पोलिस गयावया करु लागल्यावर त्याची शिटट्री दगडाने चेपवून त्याच्या हातात दिली.

यानंतर सर्वजण चिमठाण्याजवळ पोहोचले. चौघांनी पुढे जायचे चौघांनी खजिन्याच्या गाडीत बसायचं गाडी आली तर पुढं मारामारीचे सोंग करुन रस्त्यात गाडी अडवायची व आतील चौघांनी पोलीसांना ताब्यात घेवून खजिना बाहेर काढायचा अशी योजना होती.

भर दुपारी बारा वाजता नागनाथ आण्णा, जी.डी.बापू, किसन मास्तर, शंकर माळी यांनी मारामारी करण्यास सुरुवात केली. ही मारामारी अगदी खरीच आहे हा बनाव नाही हे दाखवण्यासाठी प्रत्येकाने एकमेकांना अक्षरक्षः ठेचून काढले. मारामारीचा सिग्नल बघून धोंडीराम माळी यांनी पिस्तुलचा बार काढला. त्यामुळे ड्रायव्हरने गाडीचा वेग वाढविला. यावेळी नागनाथ आण्णा व जी.डी.लाड यांच्या अगदी जवळून चाक घासून गेले.इतक्यात नागनाथ आण्णांनी ड्रायव्हरच्या बाजून पळत जावून उडी मारुन दार पकडले. पण काही केल्या ड्रायव्हर गाडी थांबवेना. नायकवडींनी पिस्तुल रोखले ब्रेक दाबण्यासाठी

विनंती करुन ही ड्रायव्हरने गाडी थांबविली नाही. शेवटी त्यांनी एक बार काढला. धोंडीराम माळी यांच्या गोळीने ड्रायव्हर जखमी झाला. त्याने गाडी थांबविली.

गाडीच्या आतील क्रांतिकारकांनी पोलीसाला विळखा घालून पिस्तुल झाडले व संगिनी ताब्यात घेतल्या. नंतर सर्व खजिना खाली ओढला. सर्वांनी धोतराच्या गाठोढयात खजिना बांधला. 'महात्मा गांधी की जय'अशी घोषणा देत तेथून पळ काढला.[३५] उघडया रानातून तीन-चार कि.मि. पळाल्यानंतर विहिरीवर पाणी पिण्यासाठी थांबले नंतर विश्रांती घेतली. सहाच्या सुमारास पोलीस व लोकांचा जमाव क्रांतिकारकांच्या मागे पाठलाग करीत असलेला दिसला. पोलीस व क्रांतीकारक यांच्या गोळीबारात एक गोळी जी.डी. बापूंच्या पिंडरीत घुसली व दुसरी गोळी दनडावर आपटून नागनाथ आण्णांच्या खांदयाला लागली.

पोलीसांच्या बरोबर लढा देत पाठीमागे थांबलेल्या आपल्या सहकारी मित्रांची वाट पहात एका झाडाखाली रावसाहेब कळके व अन्य तीन स्वातंत्र्यसैनिक ठरलेल्या ठिकाणी उभे राहिले होते. त्यांनी सर्व खजिना नांगरटीमध्ये पुरुन ठेवला होता. त्याठिकाणी हे पाच क्रांतिकारी पोहचले. नांगरटीत पुरलेल्या सर्व नोटा या नऊ वीरांनी अंधाऱ्या रात्रीत शोधून काढल्या. अंधारात जेवढया नोट सापडतील तेवढया घेवून ते आपल्या ठरलेल्या ठिकाणी मुक्कामास आले. एका शेतकऱ्याच्या घरात त्यांना आश्रय मिळाला होता. ते या गावामध्ये पोहचतात तोपर्यत पुन्हा धुळयाहून पोलिसांच्या लॉऱ्या धावून आल्या. या गावाची त्यांनी नाकेबंदी केली. तपास केला पण त्यांना काही थांगपत्ता लागला नाही. या शेतकऱ्याकडे ही त्यांनी तपास घेतला पण त्या कुणब्यांन थांगपत्ता लागू दिला नाही. काही पोलीस त्याठिकाणी थांबले व बाकीचे पुढच्या गावी निघून गेले. इकडे या स्वातंत्रयसैनिकांनी एक बैलगाडी (तट्टया) बांधून जोडली. त्यामध्ये रिकाम्या दुरडया बांधून ठेवल्या व एक मुलगी त्यामध्ये बसवून मुलीची पाठवणी भासवून ते त्या गावामधून बाहेर निघून गेले. पुन्हा नोटा पुरलेल्या ठिकाणी जावून त्या नांगरटीमधून पुष्कळ नोटांची बंडले शोधून काढली आणि त्याच गावी आणि त्याच शेतकऱ्याच्या घरी आले.

क्रांतिवीरांनी नऊ-दहा सिमेंटच्या पोत्यामध्ये ही नोटांची बंडले कुचून भरली व तोंडे शिंवून टाकली. यांच्याजवळ एवढे अमाप धन पाहून या शेतकऱ्याच्या तोंडाला पाणी सुटणे साहजिकच होते. नागनाथ आण्णांनी या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरील भाव ओळखून व या शेतक-याने केलेले सहकार्य, आश्रय व खाणंपिणं यांचा सारासार विचार करुन त्या शेतकऱ्याला काही रक्कम दिली (१०,०००) धुळे खजिना लुटल्यानंतर नागनाथ आण्णां, धोंडीराम माळी, राजुताई पाटील वगैरें यांनी तो गजपंथास नेवून ठेवला. वातावरण निवळल्यानंतर तो लोखंडी पेठाऱ्यातून वाळवा तालुक्यात आणण्यात आला.

प्रतिसरकारच्या चळवळीसाठी या खजिन्याचा फार चांगला उपयोग झाला.सातारा जिल्हयात उदयास आलेल्या प्रतिसरकारला आधुनिक राज्य संस्थेची सर्व वैशिष्टये होती. विधिमंडळातील कार्यकारिणी होती, न्यायमंडळ होती आणि संरक्षण दले होती. संरक्षण दल म्हणजे लोकांच्या फलटणी होत्या. संरक्षण दलामध्ये तुफान सेनेचा बर्हिजी पथकांचा राष्ट्रसेवा दलाचा आणि नागनाथ नायकवडी यांच्या लष्करी संघटनेचा समावेश होता.[३६]

## लष्करी संघटना स्थापण्याचा निर्णय :

नागनाथ नायकवडी महात्मा गांधीना देवासमान मानत त्यांनी मोठया भक्तीभावाने अहिंसा तत्त्व आचरणात आणले होते. परंतु वडूज व इस्लामपूर येथील मोर्चावर झालेल्या अमानुष गोळीबारामुळे त्यांची अहिंसा तत्त्वावरील श्रध्द्‌ा ढळली. अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्यच काय पण इतर काहीसुध्दा मिळविता येणार नव्हते असे त्यांना वाटले. शस्त्रास्त्रांचे महत्व मनोमन पटले. जशासतशे गोळीस गोळी या न्यायाने सैन्य उभे करुन ब्रिटि्श सत्तेबरोबर लढा देण्याचा त्यांनी निश्चय केला. १९४५ मध्ये प्रमुख भूमिगत नेत्यांनी नागनाथ आण्णांना लष्करी संघटना उभी करण्याची संमती दिली.

## शस्त्रास्त्रांची जमवाजमव :

फौजी संघटना उभा करायची तर शस्त्र हवी होती. ही शस्त्र कशी मिळवायची हा प्रश्न नागनाथ आण्णा आाणि इतर अनेक तरुणांच्या पुढे होता.म्हणून त्यांनी खाजगी व्यक्तींच्याकडे असलेल्या रायफलींची माहिती मिळवून त्यांच्यावर हल्ले चढवायला सुरुवात केली. सागावच्या पोलिस आऊट पोस्टवर हल्ला करुन ३-४रायफली मिळवल्या.पोलिस मोटारीवर हल्ला करुन काही पैसा व बंदुका मिळविल्या. अशा रितीने शस्त्रांची जमवाजमव चालू होती. परंतु मिळालेली शस्त्र फौजी संघटाना उभारण्याच्या दृष्टिनं अपूर्ण पडत होती.त्यावेळी पोर्तुगिजाच्या ताब्यात असलेल्या गोव्यात पिस्तुलांची उघड विक्री होत असे. पण ती पिस्तुले ब्रिटिश सरकारच्या हद्दीत आणतांना मात्र छुप्या मार्गाने आणावी लागत. नागनाथ आण्णां, जी.डी.लाड यांनी राजमतीला बरोबर घेवून गोव्यातून छुप्या मार्गाने काही शस्त्रे आणली.[३७] आणखी काही शस्त्रांच्या खरेदीसाठी शेणोली जवळ पे-स्पेशल लुटली. तसेच धुळयाचा साडेपाच लाखाचा खजिना लुटला. शस्त्रास्त्रांसची व पैशाची जमवाजमव झाल्यानंतर फौजी संघटना उभी रहायचा निर्णय घेतला परंतु त्यांच्यापुढे दुसरा प्रश्न उभा राहिला तो म्हणजे तरुणांना लष्करी शिक्षण देण्यासाठी तज्ञ माणूस कोठून आणायचा? नागनाथ आण्णा भूमिगत अवस्थेत असतांना सुध्दा दिल्लीला गेले. तेथे आझाद-हिंद-सेनेच्या मदतीकरीता उघडण्यात आलेल्या ऑफिसमध्ये त्यांना मनसासिंग व नानकसिंग भेटले. त्यांची निवड लष्करी शिक्षक म्हणून केली.

## नागनाथ आण्णांची मनसासिंग व नानकसिंग यांच्याशी भेट:

सुभाषबाबूंची सेना जेंव्हा ब्रम्हदेशात आली होती. त्यावेळी ब्रिटीश सरकारने एक शीख रेजिमेंट त्यांच्या बंदोबस्ता करीता ब्रम्हदेशात पाठवली होती. ही रेजिमेंट आझाद हिंद सेनेला जावून मिळाली होती. त्यामध्ये मनसासिंग व नानकसिंग होते. दोघांचेही वय चोवीस पंचवीस वर्षाचे होते. पुढे ब्रम्हदेशात ब्रिटीश लष्कराने या शीख रेजिमेंटचा पाडावकरुन

त्यांना आपल्या ताब्यात घेतले आणि ते सर्व रेजिमेंट कलकत्त्याजवळ एका कॉन्सनट्रेशन कँपमध्ये आणून ठेवली. त्यामध्ये मनसासिंग व नानकसिंग होते. या कँपभोवती विजेच्या तारांचे कुंपण होते. शिवाय अगदी कडक पहारा होता. असं असतानाही सहा शिख तरुणांनी कॉन्सनट्रेशन कॅम्पमधून एक बोगदा खणत दूरवर गेला आणी बोगदयापासून हे सहा शीख तरुण बाहेर पडले. त्या सहा शीख तरुणांमध्ये मनसासिंग व नानकसिंग हे दोघे होते. यानंतर हे दोघे पंजाबमध्ये आले. तेथे आल्यानंतर सुभाषबाबूंच्या व्यक्तीमत्त्वांन भारलेले हे दोघे तरुण आपण स्वातंत्र्याकरिता काहीतरी केले पाहिजे म्हणून धडपडत होते. लष्करी संघटना उभारुन ब्रिटीश सरकारला येथून हाकलून लावले पाहिजे हे सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेत त्यांनी काही काळ काढलेला असल्यामुळे त्यांना पटले होते.[३८] तशा प्रकारचे काम मिळविण्यासाठी व आझाद हिंद सेनेच्या मदतीकरिता दिल्लीला दरियागंज येथे उघडलेल्या कचेरीत आले होते. तशा स्वरुपाच काम मिळणार नाही असे मणिबेनकडून उत्तर मिळाल्यानंतर ते आपल्या मुलखात जाण्याकरिता निघाले होते. दरम्यान रस्त्यातच त्यांना नागनाथांनी येवून गाठले. आपण एवढया दूर का आलो आहेत याच प्रयोजन नागनाथांनी मोडक्या तोडक्या हिंदी भाषेत सांगितले. त्या तरुणांना हवे तसे काम आपल्याकडे आहे याचाही खुलासा केला. त्या दोन तरुणांना सातान्याचे नाव ऐकून माहित होते. ते दोघेही लष्करात असल्यामुळे त्यांना मराठयाविषयी बरीच माहिती होती. म्हणून 'तुम ...मराठा...मराठा' करीत त्यांनी अगदी दिलखुलासपणे नागनाथांच्या फौजी संघटनेच्या कामाकरिता सातान्यास येण्याची तयारी दर्शविली. परंतु जाण्यापूर्वी आपल्या कुटूंबाला भेटण्याची इच्छा त्यांनी नागनाथांजवळ केली. नागनाथ, नानकसिंग, मनसासिंग बरोबर त्यांच्या खेडयाकडे जावून भेटून आले. आणि सातारचा रस्ता धरला.

दोघा शिक्षकांसह नागनाथ ऐतवडे बुद्रुक येथे आले. तेथे त्यांनी लष्करी प्रशिक्षण आयोजित करण्यास सुरुवात केली. या कामात मुख्यतः राजमती पाटील, वाय.सी.पाटील,किसन अहिर, बाळकू बिरनाळे व इतरांचे सहाय्य मिळाले. कॅम्पसाठी

निवलेली जागा ऐतवडेबुद्रुक पासून दोन मैल अंतरावर ढगेवाडीच्या जंगलात होती. मनसासिंग व नानकसिंग उत्साहाने फौजी संघटनेच्या कामात सामील झाले. नागनाथांनी वाळवे तालुक्यातील तरुण कार्यकर्ते ऐतवडयाला एकत्रित केले. नवेखेड, जुनेखेड, वाळवे, पडवळवाडी,गोटखिंडी,अंकलखोप.कामेरी,ढगेवाडी आदी २० ते २५ खेडयातील शेकडो तरुण या फौजी संघटनेत येवून दाखल झाले. पहाटेपासून फौजी संघटनेच्या कवायतीस प्रारंभ व्हायचा तर १२ वाजेपर्यंत लष्करी अधिकाऱ्यांची तालीम सुरु असे. मनसासिंग, नानकसिंग, किसन अहिर, नागनाथ, राजुताई, वाय.सी.पाटील, आदी लोक या संघटनेच्या कामाकरिता आहोरात्र झटत होते. सहा ते आठ आठवडे लष्करी प्रशिक्षणाचे शिबिर चालले. नागनाथ व इतर भूमिगतांना अशी शंका आली की, आपल्या या शिबीराचा पोलीसांना सुगावा लागला असावा. खबरदारी म्हणून कॅम्प दुसऱ्या ठिकाणी हलवावा असा निर्णय घेतला गेला.

कॅम्पसाठी दुसरी जागा शोधून काढण्याची जबाबदारी किसन अहिर व इतर दोघांवर सोपविण्यात आली. कोल्हापूर संस्थानातील शाहुवाडी महाल, शिराळा पेटा, पाटण तालुका या भागातील सर्व जंगलात सुमारे ५ ते६ दिवस हिंडून एकजागा निश्चित केली. त्यांनी शाहुवाडी महालपैकी 'थाबडयाजवळच' सर्व दृष्टीन सोयीस्कर म्हणून एक गाव पसंत केलं सर्व क्रांतीकारकानांही ही जागा पसंत पडली आणि ढगेवाडीचा कॅम्प हलवसून थाबडयाच्या मैदानात नेला. तिथं निर्धास्तपणे लष्करी शिक्षण चालू झालं. जवळजवळ दोन महिने तिथे हा कॅम्प चालू होता. एके दिवशी कवायत चालू असताना पवनाईच्या माथ्यावर निरभ्र आकाशातील लहानशा ढगाप्रमाणे एक माणूस दिसून आला. ताबडतोब बरेच सैनिक धावत सुटले. तो दिशा बदलून दक्षिण दिशेने धावू लागला. सैनिकांनी पाठलाग करून शेवटी त्याला पकडून आणला, जबरदस्त मार दिला. त्यामुळे तो कबूल झाला की मी सी.आय.डी. आहे. सरकारला या कॅम्पची कुणकुण लागल्यामुळे प्रत्यक्ष माहिती मिळविण्यासाठी मला पाठवले आहे.

काही लोकांनी त्याला ताबडतोब गोळी घालून ठार मारण्याचा चंग बांधला परंतु नागनाथ व इतर प्रमुख क्रांतीकारक दारुगोळा,काडतुसे,इतर साहित्ये मिळविण्यासाठी बरेच दिवस कॅम्पबाहेर पडले होते.ते परत येईपर्यत त्याला जिवंत ठेवण्याचा निर्णय झाला. तो पळून जावू नये म्हणून त्याला अंढयात गळयाएवढा पाच फूट खोल खड्डा काढून पुरुन ठेवला, जिवंत रहाण्यापुरत त्याला अन्न पाणी दिलं. पुढे दोनच दिवसांनी नागनाथ व इतर मंडळी परत आली.

सी.आय.डी. ने मला ठार मारु नका घरी लहान मुलंबाळं आईबाप बायको आहें माझ्याविना त्यांना कोणाचा आधार नाही. त्यांना निराधार करु नका. निव्वळ पोट जाळण्यासाठी मी हे निच कृत्य केले. मी देशद्रोही ठरलो मला क्षमा करा व जिवंत सोडून दया. मी ही माहिती कोठेही सांगणार नाही. असे काकूळतेने सांगत होता. शेवटी क्रांतीकारकांनी कॅम्प हलवेपर्यंत त्याला तिथेच कैद करुन ठेवला. त्याचे डोळे बांधून त्याला पूर्वेस २० मैल अंतरावर सोडून दिले. आता इथं कॅम्प चालवणे धोक्याचे आहे. कॅम्प हलवण जरुरी आहे. असे सर्वाना वाटले. जागा शोधण्यासाठी किसन अहिरनं सर्व भाग पायाखाली पालता घातला होता. त्यावेळी मणदूरची एक जागा पसंत पडली होती.

कॅम्प हलवण्यापूर्वी परत एकदा त्या जागेचे निरक्षण करावे म्हणून किसन अहिर २३ फे.१९४६ च्या तिसऱ्या प्रहरी बाहेर पडले. जागेचे निरिक्षण करुन दुसऱ्यादिवशी परत यावे असे सर्वानी आवर्जुन सांगितल. किसान अहिरने मणदूरच्या जंगलातील जागेची पहाणी केली. आणि ते थाबडयाकडे निघाले वाटेत त्यांना पांडू मास्तर व इतर दोन भूमिगत भेटले. ते पोलिसांना हुलकावणी देवून आले होते. पांडू मास्तरांनी किसन अहिरांना सांगितले या मार्गाने गेलात तर निष्कारण पोलिसांच्या तावडीत सापडाल. किसन अहिरांनी पांडू मास्तरांचा सल्ला मानला. या तिघांबरोबर ते मणदूरला परत गेले.[३९]

शिराळा येथील एस.बी.खोचे नावाचा कॉन्स्टेबल २४ फे. सकाळी मणदूर येथील पेट्रोल डयुटीवर आला होता. त्यान्ना बातमी लागली की ,चांदोलीच्या तेल्यास काही कॉंग्रेस

फराऱ्यांनी धक्काबुक्की केली होती. कॉंग्रेस फरारी या भागात वावरत आहेत ही शंका खोचे कॉन्स्टेबलला आली.तो अतिशय घाबरला पोलिस पाटलाच्या घरी आपली सायकल ठेवून पोलिस पाटलाला सोबत घेवून तो जाधववाडीला गेला. पांडू मास्तर, किसन अहिर, व इतर दोघे मणदूरला पोहोचले. त्यांना समजलं की पोलीस पाटलांच्या घरी पोलीस काही काळ थांबला होता. ताबडतोब ते चौघे पोलिसपाटलाच्या घरी गेले व चौकशी केली पण पाटलाच्या पत्नीने कानावर हाथ ठेवले व आपल्याला काही माहित नाही असे सांगितले या चौघांनी पाटलांची पत्नी नको म्हणत असतांना खोच्याची सायकल बरोबर घेतली.

पाटलाच्या पत्नीने धावत जावून जाधववाडीला ही बातमी दिली. त्यामुळे खोची कॉन्स्टेबलसची खात्री झाली कि, कॉंग्रेस फरारी आपल्या मागे लागले आहेत. खोचे कॉन्स्टेबलने ताबडतोब दोन चिठ्ठ्या खरडल्या एक चरणच्या तलाठयासाठी तर दुसरी कोकरुड येथील फौजदारासाठी.

ठरलेल्या वेळी किसन अहिर न् आल्यामुळे कॅम्पवर चिंतेचे वातावरण पसरले. मणदूरच्या जंगलात किसन अहिरांना काय झाले हे पहाण्यासाठी दि.२४ फे. तिसऱ्या प्रहरी वाळव्याचे रामू संतू अहिर, चरणचे बंडू पांडू नायकवडी व खेडचे शामराव तात्या पाटील यांना पाठविण्यात आले. इकडे खोचे कॉन्स्टेबलचा निरोप कोकरुड सेंटरच्या पी.एस.आय. ला मिळताच तो दहा कॉन्स्टेबलची पार्टी घेवून मणदूरला निघाला. २५ फे. पहाटे चार वाजता मणदूरपासून साधारण १ मैल असलेल्या फूटसडकेवर ते तिघे व पी.एस.आय.ची भेट झाली. पी.एस.आय. ने त्या तिघांना थांबवून त्यांची झडती घेतली त्या झडतीत त्यांना सहा चेंबरचा रिव्हॉलव्हर ३.०३ च्या दोन जिवंत गोळया व एक अर्ज मिळाला. पी.एस.आय. ने त्या तिघांना आपल्या बरोबर घेतले व सूर्योदयापूर्वी मणदूरला पोहचले. मणदूर येथे कॉंग्रेस फराऱ्यांना पकडण्यासाठी चंदू बुवांच्या घराची झडती घेतली. चंदू बुवांनी पोलिसांची थाप दारावर पडताच या सर्वांना पाठीमागील दारातून बाहेर काढले. त्यामुळे कोणीही सापडले नाही.

पांडू मास्तर, किसन अहिर, व इतर दोघांना बरेच अंतर चालून गेल्यावर तिघा कॉंग्रेस फराऱ्यांना पकडल्याची बातमी समजली. किसन अहिरना फार मोठा धक्का बसला. ही माणसे आपलीच आहेत.याची पक्की खात्री झाली. ते परत एकटेच मणदूरला परतले. तिघांच्या अटकेला आपण जबाबदार आहोत असा त्यांनी समज करुन घेतला.

मणदूरला पाठवलेल्यांपैकी कोणीही अदयाप परत न् आल्यामुळे कॅम्पमधील सर्वांना चिंता वाटू लागली .धोक्यातून त्यांची सुटका करण्यासाठी दि.२५फे. रोजी पहाटे सर्वांनी कॅम्प सोडला.'कदम कदम बढाये जा' यासारखी आझाद हिंद सेनेची मार्चींग गाणी म्हणत ते मणदूरच्या दिशेने निघाले. कॉंग्रेसच्या गाण्यांचा आणि घोषणांचा आवाज ऐकून किसन अहिर अतिशय आनंदित झाले. या सर्वांनी एकमेकांना पाहिल्यावर 'महात्मा गांधी की जय', 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणा देत ते दुप्पट वेगाने एकमेकाकडे पळत सुटले. भेट होताच किसन अहिरनी त्यांना घडलेला सर्व प्रकार सागितला. आपल्या तीन सहकाऱ्यांची सुटका करण्याचा त्यांनी निर्धार केला.

**पोलीसांशी चकमक :**

मणदूरच्या एक मैलभर दूर उत्तरेकडून दक्षिणेकडे वहात जाणाऱ्या ओढयात सर्वांनी पोलीसांची वाट बघत दबा धरुन बसायचे. पोलिस शिराळयाकडे जाण्यास ओढयात उतरताच सर्वांनी त्यांच्यावर गोळीबार करायचा असे ठरले. त्यांनी आपले दोन गट केले. एका गटाचे प्रमुख किसन अहिर व नानकसिंग होते. व दुसऱ्या गटाचे प्रमुख नागनाथ नायकवडी व मनसासिंग होते. हे सर्व जण आपल्या सहकाऱ्यांना घेवून ओढयामधून जाणा-या रस्त्यांच्या दक्षिणेकडे असलेल्या खडड्यात लपून बसले.

२५ फे. रोजी दु. ३ वाजता पोलिसांनी मणदूर सोडले. मैलभर चालून गेल्यावर उतारावरुन ओढयाकडे जात असतांना खोचे कॉन्स्टेबलने ओढयाच्या पलीकडे चढावर असलेल्या झुडूपात गांधी टोप्या घातलेली दोन माणसे आडवी झालेली पाहिली. आणखी

काही लोक दृष्टीस पडताच पोलिसांची खात्री पटली की आपण पूर्वनियोजित हल्ल्यात सापडलो आहोत. नेमके किती स्वातंत्र्यसैनिक आहेत याचा त्यांना अंदाज येईना. दरम्यान गोळी बारास स्वातंत्र्यसैनिकांनी सुरुवात केली.

'महात्मा गांधी की जय', भारतमाता की जय, सुभाषबाबू की जय, या घोषणांनी स्वा.सै. प्रभावित झाले होते. आपल्या सहकाऱ्यांना पकडल्याच्या रागाने भडकल्यामुळे स्वा.सैनिक आक्रमक आणि निर्भय झाले होते. बेछूटपणे ते गोळीबार करत होते. पी.एस.आय.च्या आदेशाबरोबर सर्व कॉन्स्टेबलनी गोळीबार सुरु केला होता. खोचे व तारळेकर हे दोघे मोठया कौशल्याने आणि चपळाईने पंधरा फूट उंच असणाऱ्या कडयाच्या काठावर जावून बसले. आणि अचूकपणे गोळीबारास सुरुवात केली. गोळीबाराच्या आवाजाने सारे वातावरण भरुन गेले होते.

किसन अहिर आणि नानकसिंग मोठया शौर्याने पुढे घुसत होते. स्वतःच्या जीवाची पर्वा न् करता पोलिस ज्या दिशेने गोळीबार करत होते त्या दिशेने ते दोघे गोळीबार करत होते. त्या धामधुमीत त्यांनी कड्याच्या काठावर बसलेल्या खोचे व तारळेकरला पाहिले नव्हते. हे दोघे सोडून पी.एस.आय. आणि इतर कॉन्स्टेबल घाबरुन किसन आहिर व नानकसींग यांना शरण गेले. पोलीसांकडून बंदूका आणि गोळया काढून घेण्यासाठी किसन आहिर आणि नानकसिंग पुढे गेले तेव्हा ते तारळेकरांच्या दृष्टीच्या टप्प्यात आले लगेच त्याने दोन गोळया किसन आहिर व नानकसिंग यांना अचूक मारल्या दोघे एकापोठोपाठ खाली पडले. असहय्य वेदना होत असताना देखील 'महात्मा गांधी की जय', जयहिंद, चलो दिल्ली अशा घोषणा ते देत होते किसन आहिरांना लागलेली गोळी त्यांच्या मांडीतून आरपार निघून गेली आणि नानकसिंगना लागलेली गोळी त्यांच्या कानशिलातून बाहेर गेली दोन प्रमूख वीर पडल्यावर क्रांतीवीरांना फार दुखः झाले त्यांनी गोळयांचा वर्षाव चालू केला पोलीस सत्वर पळ काढून लॉरीमध्ये बसले आणि शिराळा मार्गाने भरधाव निघून गेले.[४०]

बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे लष्करी संघटना उभी करायची नायकवडी यांचे स्वप्न अपूरे राहिले. या दोन हूतात्म्यांच्या नावाने नायकवडी यांनी नानकसिंगांच्या नावाने वसतिगृह सूरू केले. किसन आहिर यांच्या नावाने विद्यालय चालू केले. आज त्यांच्याच नावाने साखर कारखाना सुरू आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही नागनाथ आण्णांनी आपला पूर्ण वेळ समाजसेवेसाठी दिला. १९४९ साली हुतात्मा किसन आहिर विद्यालयाची व किसान शिक्षण संस्थेची स्थापना केली. १९५२ साली जनतेने लढून मिळवलेले स्वातंत्र्य काँग्रेसने भांडवलदार - जमिनदारांच्या हातात दिले असल्यामूळे जनतेसाठी राजकारणात सहभाग घेतला. १९५७ साली संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत पुढाकार घेतला आणि विधानसभा निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वतीने विजयी झाले. २५ फेब्रूवारी १९७१ रोजी हुतात्मा किसन अहिरांच्या पूतळयाचे अनावरण केले तसेच १९७२ साली किसान लिफ्ट इरिगेशन ही योजना पूर्ण केली. २६ मार्च, १९८१ साली ८ वर्षे संघर्षात्मक प्रयत्न करून सत्तेची बाजू नसताना हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि. वाळवे ची मंजूरी मिळवली. सन १९८५ साली वाळवा विधानसभा मतदार संघात अपक्ष म्हणून निवडणूक जिंकली. तसेच धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी त्यांचा लढा सतत चालू आहे. ११ जुलै, १९९३ रोजी आटपाडी तालुक्याची भव्य पाणी परिषद आयोजीत केली होती. या पाणी परिषदेत समान पाणी वाटप होवून दुष्काळ कायम हटविण्याची मागणी केली.[४१]

अशा प्रकारे नागनाथ आण्णांची गरीब, कष्टकरी जनतेची सतत सेवा आजही चालू आहे.

# संदर्भ - सुची

१. श्री. पाटील सुभाष पांडूरंग - (येडेनिपाणी)- मुलाखत

२. श्री. मुळीक निवृत्ती दादाजी - हस्तलिखीत - (स्वा.सै. बापूसाहेब देशमुख यांच्यावरती) - पृष्ठ -१०

३. श्री. पाटील सुभाष पांडूरंग -मुलाखत

४. ---- कित्ता ----

५. स्वां.सै. पाटील एस.बी. - मुलाखत

६. स्वा.सै. पाटील रंगराव दादा - (शिगाव) - मुलाखत

७. सगरे अजित - जिद्दी झुंजार - पृष्ठ -२४

८. ---- कित्ता ----

९. स्वा.सै. श्रीमती पाटणकर इंदुताई - मुलाखत

१०.स्वा.सै. देशपांडे डी.जी. - मुलाखत

११.डॉ. शिंदे अे.बी. - द पॅरलल गर्व्हमेंट इन सातारा - पृष्ठ -९१

१२.---- कित्ता ----

१३.डॉ. शिंदे आबासाहेब - सातारचे प्रतिसरकार -प्रसंग आणि व्यक्ती - पृष्ठ -३३

१४.---- कित्ता ---- - पृष्ठ -३४

१५.---- कित्ता ---- - पृष्ठ -१३०

१६.श्री. गोखले पुरुषोत्तम पांडूरंग - जागृत सातारा - पृष्ठ -१९८

१७.स्वा.सै. श्रीमती पाटणकर इंदुताई - मुलाखत

१८.श्री. गोखले पुरूषोत्तम पांडुरंग - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -२१०

१९.स्वा.सै. पाटील एस. बी. - मुलाखत

२०.श्री. गोखले पुरूषोत्तम पांडुरंग - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -१९७

२१.स्वा.सै. देशपांडे डि.जी. - मुलाखत

२२.प्रा. पाटील देवदत्त (लेखक-शर्थ कादंबरी, पांडू मास्तर यांच्यावरती) - मुलाखत

२३.---- कित्ता ----

२४.स्वा.सै. श्रीमती पाटणकर इंदुताई - मुलाखत

२५.क्रान्तिवीर नायकवडी नागनाथ - मुलाखत

२६.डॉ. शिंदे आबासाहेब - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -७

२७.श्री. कोगनोळे विजय - रणरागीणी राजूताई - पृष्ठ -१९

२८.डॉ. पाटणकर भारत - क्रान्तिवीर नागनाथ नायकवडी - पृष्ठ -८

२९.डॉ. शिंदे अे.बी. - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -२४०

३०.श्री. सनदे सा. बा. - जीवन संग्राम - पृष्ठ -२६

३१.---- कित्ता ----

३२.क्रान्तिवीर नायकवडी नागनाथ - मुलाखत

३३.डॉ. शिंदे आबासाहेब - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -४४

३४.स्वा.सै. पवार रामचंद्र सखाराम - ( कुंडल ) -मुलाखत

३५.डॉ. शिंदे आबासाहेब - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -७१

३६.स्वा.सै. लाड जी.डी. - (कुंडल) - मुलाखत

३७.स्वा.सै. श्रीमती पाटील राजुताई - मुलाखत

३८.स्वा.सै. देशपांडे डी.जी. - मुलाखत

३९.क्रान्तिवीर नायकवडी नागनाथ - मुलाखत

४०.श्री. सनदे सा. बा. - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -१००

४१.डॉ. पाटणकर भारत - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -३०